# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१० ८६२९
दिनांकः- २१/१२/२०१० 21 DEC 2010

प्रति,
प्राचार्य,
विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/
हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नालॉजी पदवी व पदविका अभ्यासक्रम संस्था तसेच
एमबीए/एमसीए पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम संस्था

विषयः- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.

संदर्भः- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/मान्यता/२०१०/३३७८ दि.२६/११/२०१०

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सोबत खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास,एच.एम.सी.टी.,वास्तुशास्त्र पदवी व पदविका तसेच एम.बी.ए. व एम.सी.ए पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत शासनाने क्र.टिईएम २०१०/(१२५/२०१०)तांशि-४,दि.६/११/२०१० अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची प्रत जोडण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयातील तरतूदीनूसार आपल्या संस्थेमधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्याना ५०% प्रतिपूर्ती करण्यासाठी कार्यवाही करावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेत स्थळावर प्रकाशित करण्यासाठी(EBC GR -2010-11)

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्रमांक टिईएम २०१०/(१२५/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ६ नोव्हेंबर, २०१०.

**प्रस्तावना** : शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यविकास विभाग या विभागांच्या अधिपत्याखाली असणा-या अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणा-या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून एक सामाजिक बांधीलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून राज्य शासनाने सदर विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशिष्ट मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग या समाज घटकांतील विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय विभागामार्फत निर्गमित करण्यात येत आहेत आणि अनुसूचित जमाती या घटकातील विद्यार्थ्यांसाठी फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा आदेश आदिवासी विकास विभागाकडून निर्गमित करण्यात येत आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीबाबतचे आदेश त्या त्या प्रशासकीय विभागामार्फत निर्गमित करण्यात येतात. त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेणा-या आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचे आदेश या विभागाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय** : राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांत सन २०१०-११ या वर्षी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी पुढील योजनेस मंजूरी देण्यात येत आहे.

(१) खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास वर्गासाठी सन २००६-२००७, २००७-

२००८ , २००८-२००९ आणि २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यात आलेली योजना सन २०१०-११ या चालू शैक्षणिक वर्षात चालू राहील.

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | --- |
| --- | वास्तूशास्त्र | --- |

(२) या योजनेचा लाभ वर नमूद केलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा (CET) प्रवेश घेतलेल्या मागास विद्यार्थ्यांसाठी देय राहील.

(३) ही योजना अभिमत विद्यापीठांना लागू राहणार नाही.

(४) आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्काची ५० टक्के दराने प्रतिपूर्ती करण्यात यावी. त्यासाठी वार्षिक उत्पन्नाची अट रु. १,००,०००/- अशी राहील.

(५) शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचे सदर धोरण हे सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षाकरिता लागू राहील.

२. सदर सवलत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

३. आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे संबंधित तहसिलदार यांचे असावे.

४. आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांबाबत सदर योजना चालू ठेवण्यासाठी या विभागाकडून आवश्यक रकमेची तरतूद करण्यात येईल.

५. वर नमूद केलेल्या ३ पदविकांची प्रवेश प्रक्रिया, पदविका प्रवेश नियमानुसार राबविण्यात यावी.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१०१११२२०१८३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.